
# पाच चिनी भाऊ

क्लेअर हचिट बिशप आणि कुर्त वीज



**पाच चिनी भाऊ**
**क्लेअर हचिट बिशप**

मराठी अनुवाद
नेहा सुगवेकर

कृतज्ञता -
अरविंद गुप्ता

आभार -
ग्राफिक्स :
कुर्त वीज
अभय कुमार झा

मुद्रक : स्क्रिप्ट आर्ट
९१४ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.

प्रकाशनवर्ष : २००५

मूल्य : रु. १५/-

सौजन्य -
**रमेश गरवारे चॅरिटी ट्रस्ट**

**कजा कजा मरू प्रकाशन**
द्वारा : गरवारे बालभवन
सारसबागेसमोर, पुणे - ४११ ००२.
फोन : २४४४२१०९.

Supported by -
**Ramesh Garware Charity Trust**

**Kaja Kaja Maru Publication**
C/o. Garware Balbhavan
Opp. Sarasbaug,
Pune - 411 002.
Phone : 24442109.

**Five Chinese Brothers.**
**By Claire Huchet Bishop**

Marathi translation
Neha Sugavekar

Special Thanks :
Arvind Gupta

Thanks -
Graphics :
Kurt Wiese
Abhay Kumar Jha

Printed at : Script Art
914 Sadashiv Peth,
Pune - 411 030.

Publication : 2005

Price : Rs. 15/-





# पाच चिनी भाऊ

*क्लैर हचिट बिशप आणि कुर्त वीज*

## THE FIVE CHINESE BROTHERS

*Claire Huchet Bishop & Kurt Wiese*






खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. चीनमध्ये पाच भाऊ रहात होते.
त्यांच्यात एक खास गोष्ट होती.
ती म्हणजे ते सर्वजण दिसायला अगदी सारखे होते.

Once upon a time
there were
Five Chinese Brothers and
they looked exactly alike.


ते सर्वजण आणि त्यांची आई असे समुद्राकाठी एका छोट्या घरात रहात होते.


They lived with their mother in a small house not far from the sea.



पहिला चिनी भाऊ समुद्राचं पाणी पिऊ शकत असे. दुसऱ्या भावाची मानच लोखंडाची बनलेली होती. तिसरा भाऊ त्याचे पाय लांब लांब ताणू शकत असे. चौथ्या भावावर आगीचा काही परिणाम होत नसे आणि पाचवा भाऊ त्याचा श्वास कितीही वेळ रोखून धरत असे.

The First Chinese Brother could swallow the sea. The Second Chinese Brother had an iron neck. The Third Chinese Brother could stretch and stretch and stretch his legs. The Fourth Chinese Brother could not be burned. And, The Fifth Chinese Brother could hold his breath indefinitely.





दररोज सकाळी त्यातला पहिला चिनी भाऊ मासे पकडायला समुद्रावर जात असे. हवा कशीही असली, वादळी वाऱ्याची असली, तरी तो नेहमी सुंदर आणि खूप दुर्मिळ मासे पकडून आणत असे आणि गावच्या बाजारात मोठ्या किंमतीला विकत असे. एके दिवशी तो असाच बाजारातून परत येत होता, तेव्हा त्याला एका छोट्या मुलानं विचारलं की, ''तुम्ही मला तुमच्याबरोबर मासे पकडायला घेऊन जाल का ?''

Every morning the First Chinese Brother would go fishing, and whatever the weather, he would come back to the village with beautiful and rare fish which he had caught and could sell at the market for a very good price.

One day, as he was leaving the market place, a little boy stopped him and asked him if he could go fishing with him.

पहिल्या चिनी भावानं लगेच उत्तर दिलं, ''छे ! हे काही शक्य नाही !''; पण त्या छोट्या मुलानं फार हट्ट केला आणि त्या चिनी भावाच्या फार मागे लागला. त्यानं शेवटी त्याला त्याच्याबरोबर मासे पकडायला नेण्याचं मान्य केलं आणि तो त्या छोट्या मुलाला म्हणाला, ''एका अटीवर मी तुला नेईन-मासे पकडायला. तिथे माझं सगळं तुला ऐकावं लागेल.'' छोटा मुलगा म्हणाला, ''हो ! हो जरूर.''


दुसऱ्या दिवशी सकाळी पहिला चिनी भाऊ आणि छोटा मुलगा सुमद्रकिनाऱ्यावर गेले. तिथे गेल्यावर पहिला चिनी भाऊ छोट्या मुलाला म्हणाला, ''लक्षात आहे ना ? मी जे सांगीन ते ऐकणार आहेस ना ? मी तुला खूण केल्याबरोबर तू परत ये.'' ''हो हो नक्की !'' असं म्हणून छोट्या मुलानं मान डोलावली.


"No, it could not be done," said the First Chinese Brother.
But the little boy begged and begged and finally
the First Chinese Brother
consented. "Under one condition," said he,
"and that is that you shall obey me promptly."
"Yes, yes," the little boy promised.
Early next morning, the First Chinese Brother and the little boy
went down to the beach.
"Remember," said the First Chinese Brother, "you must obey me promptly.
When I make a sign for you to come back, you must come at once."
"Yes, yes," the little boy promised.



त्यानंतर पहिल्या चिनी भावानं समुद्राचं सगळं पाणी पिऊन टाकलं.

Then the First Chinese Brother swallowed the sea.






पाणी संपून गेल्यामुळे समुद्रातले सगळे मासे समुद्राच्या तळाशी असलेल्या वाळूत अडकून बसले आणि तडफडायला लागले आणि समुद्रातला खजिना स्पष्ट दिसायला लागला. इतक्या सगळ्या सुंदर गोष्टी बघून तो मुलगा अगदी खूश झाला आणि इकडेतिकडे पळायला लागला आणि छान छान शंख, शिंपले आणि इतर छान छान गोष्टी खिशात भरायला लागला.

And all the fish were left high and dry at the bottom of the sea.
And all the treasures of the sea lay uncovered.
The little boy was delighted.
He ran here and there stuffing his pockets with strange pebbles, extraordinary shells and fantastic algae.



तेवढ्या वेळात चिनी भावानं समुद्राकाठी काही मासे पकडले.
त्यानं इतका वेळ तोंडात समुद्राचं सगळं पाणी
धरून ठेवलं होतं; पण आता मात्र तो फार थकला.
इतक्या मोठ्या समुद्राचं सगळं पाणी तोंडात धरून ठेवणं
ही काही सोपी गोष्ट नव्हती.
म्हणून त्यानी छोट्या मुलाला हातांनीच परत येण्याची
खूण केली. छोट्या मुलानं ते पाहिलं तरी सुद्धा
तो काही समुद्राच्या बाहेर आला नाही.

Near the shore the First Chinese Brother gathered some fish while he kept holding the sea in his mouth. Presently he grew tired. It is very hard to hold the sea. So he made a sign with his hand for the little boy to come back. The little boy saw him but paid no attention.







म्हणून मग चिनी भावानं जोरात हात-पाय हलवून त्या छोट्या मुलाचं लक्ष वेधण्याचा आणि त्याला किनाऱ्यावर बोलावण्याचा प्रयत्न केला; पण मुलानं काही त्याच्याकडे लक्ष दिलं नाही आणि तो आणखीनच आत पळायला लागला. आता मात्र चिनी भावाची शक्ती संपली आणि तोंडात समुद्र उसळत असल्यासारखं त्याला वाटायला लागलं. परत एकदा त्यानं मुलाला बाहेर बोलावण्याचा प्रयत्न केला; पण मुलानं त्याला वेडावून दाखवलं आणि आणखीन जोरात पळायला लागला.

The First Chinese Brother made great movements with his arms and that meant "Come back!" But did the little boy care? Not a bit and he ran further away. Then the First Chinese Brother felt the sea swelling inside him and he made desperate gestures to call the little boy back. But the little boy made faces at him and fled as fast as he could.

पहिल्या चिनी भावानं समुद्र तोंडात धरून ठेवण्याचा खूप प्रयत्न केला; पण शेवटी त्याचं तोंड दुखून दुखून फाटतं की काय असं वाटायला लागलं आणि शेवटी त्याच्या तोंडातून समुद्राचं सगळं पाणी अखेर बाहेर पडलं आणि तो वाळलेला समुद्र परत पाण्यानी काठोकाठ भरून गेला आणि तो मुलगा त्या पाण्यात बुडून गेला.




The First Chinese Brother held the sea until he thought he was going to burst.
All of a sudden the sea forced its way out of his mouth, went back it its bed
... and the little boy disappeared.



जेव्हा पहिला चिनी भाऊ छोट्या मुलाला न घेता एकटाच गावात परत आला,
तेव्हा त्याला पकडून तुरुंगात ठेवलं आणि त्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा केली.
ज्या दिवशी त्या पहिल्या चिनी भावाला शिक्षा होणार होती,
तेव्हा त्यांनी न्यायाधीशांना विनंती केली की, ''कृपा करून मला माझ्या आईला शेवटचं भेटून
तिचा निरोप घेण्याची परवानगी द्यावी.''
त्यावर न्यायाधीश म्हणाले, ''अशी शेवटी इच्छा सांगणं हा प्रत्येक अपराधी माणसाचा हक्क आहे.''
आणि त्यांनी चिनी माणसाला आईला शेवटचं भेटण्याची परवानगी दिली.
भेटण्याची परवानगी मिळाल्यावर पहिला चिनी भाऊ घरी आला
आणि परत जाताना मात्र त्याचा दुसरा भाऊ तुरुंगात गेला.

When the First Chinese Brother returned to the village, alone, he was arrested,
put in prison and condemned to have his head cut off.
On the morning of the execution he said to the judge:
"Your Honour, will you allow me to go and bid my mother good-bye?"
"It is only fair," said the judge.
So the First Chinese Brother went home ....
and the Second Chinese Brother came back in his place.





चिनी भावाचा शिरच्छेद करताना
बघण्यासाठी गावातले सगळे लोक
चौकात जमले.
शिपायांनी तलवारीनं दुसऱ्या
भावाच्या मानेवर जोराचा
वार केला;

All the people were
assembled on the village
square to witness the
execution.
The executioner took
his sword
and struck a mighty blow.




पण हा दुसरा चिनी भाऊ हसत हसत उठून उभा राहिला.
जसं काही त्याला काहीच झालं नाही.
या दुसऱ्या चिनी भावाची मानच लोखंडाची बनलेली असल्यामुळे
कोणीच कापू शकत नव्हतं.
त्याला अशा प्रकारे जिवंत बघून लोकांना फार राग आला आणि
त्या सर्वांनी त्याला समुद्रात बुडवण्याची शिक्षा देण्याचे ठरवले.

But the Second Chinese Brother got up and smiled.
He was the one with the iron neck
and they simply could not cut his head off.
Everybody was angry and they decided
that he should be drowned.



त्याच्या दुसऱ्या दिवशी दुसऱ्या चिनी भावानं न्यायाधीशांना विनंती केली की,
''आपण मला माझ्या आईला शेवटचं भेटून तिचा निरोप घेण्याची
कृपया परवानगी द्या.''
त्यावर न्यायाधीश म्हणाले, ''जरूर ! तो तुझा हक्कच आहे.''
परवानगी मिळताच दुसरा चिनी घरीच थांबला
आणि त्याच्याऐवजी तिसरा चिनी भाऊ तुरुंगात गेला.
सगळे भाऊ दिसायला एकदम सारखे असल्याने
कोणाला काहीसुद्धा शंका आली नाही.

On the morning of the execution,
the Second Chinese Brother said to the judge:
"Your honour, will you allow me to go
and bid my mother good-bye?"
"It is only fair," said the judge.
So the Second Chinese Brother went home....
and the Third Chinese Brother came back in his place.
He was pushed on a boat which made for the open sea.





तिसऱ्या भावाला एका होडीत बसवून
समुद्राच्या मधोमध नेलं.

When they were far out on the ocean,

आणि मग त्याला
नावेतून उचलून
समुद्रात ढकलून दिलं.

the Third Chinese
Brother was thrown
overboard.





समुद्रात पडताच त्यानं आपली पायांची लांबी वाढवायला सुरुवात केली.
लांब होता होता त्याचे पाय समुद्राच्या तळाला टेकले.

But he began to stretch and stretch and stretch his legs,
way down to the bottom of the sea.


त्याचा चेहरा समुद्राच्यावर आलेला बघून लोकांना आश्चर्य वाटत होतं आणि हा तिसरा चिनी भाऊ मात्र हसत होता. कारण आता त्याला कोणीच समुद्रात बुडवू शकलं नसतं. हे सगळं पाहून गावातले लोक फार रागावले आणि त्यांनी चिनी भावाला जाळून टाकण्याचं ठरवलं. ज्या दिवशी चिनी भावाला जाळून टाकायचं होतं त्या दिवशी तिसरा चिनी भाऊ न्यायाधीशांकडे गेला आणि त्यानं पण आईला शेवटचं भेटून तिचा निरोप घेऊन येण्याची परवानगी मागितली. ‘जरूर’ न्यायाधीशांनी तिसऱ्या भावाला पण आईला भेटण्याची परवानगी दिली. तिसरा भाऊ घरी आला; पण त्याच्या जागी चौथा भाऊ परत गेला.




And all the time his smiling face was bobbing up and down on the crest of the waves.
He simply could not be drowned.
Everybody was very angry, and they all decided that he should be burned.
On the morning of the execution, the Third Chinese Brother said to the judge:
"Your Honour, will you allow me to go and bid my mother good-bye?"
"It is only fair," said the judge.
So the Third Chinese Brother went home ....
and the Fourth Chinese Brother came back in his place.

चौथ्या भावाला एका मोठ्या लाकडी खांबाला बांधलं आणि त्या खांबाला आग लावून दिली.
यावेळी पण हे बघायला सगळा गाव जमला होता.
थोड्याच वेळात त्या खांबानं पेट घेतला आणि सगळीकडून मोठ्या मोठ्या ज्वाळा उठायला लागल्या.
त्याचवेळी चौथा चिनी भाऊ म्हणाला, ''इथे तर मला खूप मजा येते आहे.''
त्याचं ते बोलणं ऐकून गावातले लोक म्हणाले, ''अजून लाकडे आणा'' आणि त्यांनी खूप मोठी आग पेटवली.
''आता तर मला अगदी स्वर्गात असल्यासारखं वाटतंय !''
चौथा चिनी भाऊ म्हणाला. खरं म्हणजे या चौथ्या भावाला जाळता येणं शक्य नव्हतं.
गावातले लोक सगळं बघून अजूनच चिडले आणि त्यांनी त्याला
भट्टीमध्ये घालून संपवण्याचं ठरवलं.

He was tied up to a stake.
Fire was set to it and all the people stood around watching it.
In the midst of all the flames they heard him say: "This is quite pleasant."
"Bring some more wood!" the people cried.
The fire roared higher.
"Now it is quite comfortable," said the Fourth Chinese Brother,
for he was the one who could not be burned.
Everybody was getting more and more angry every minute
and they all decided to smother him.







त्याला भट्टीत टाकून गावातले लोक रात्रभर
भट्टीच्या जवळ थांबून लक्ष ठेवून होते,
की आरोपी त्यांची नजर चुकवून भट्टीतून
पळून तर जात नाही ना ?

They were not going to be tricked again!
So they stayed there all night and even a
little after dawn, just to make sure.

सकाळी जेव्हा त्यानी भट्टीचं दार उघडलं तेव्हा चौथा चिनी भाऊ डोळे चोळत बाहेर आला
आणि म्हणाला, ''रात्री काय छान छोप लागली होती !''
इतकी धग असलेल्या भट्टीतून सुद्धा चिनी भाऊ बाहेर आला यावर कोणाचाच विश्वास बसत नव्हता
आणि सगळेजण आश्चर्यानं त्याच्याकडे बघत होते.
एवढ्यात न्यायाधीश पण तिथे पोहोचले आणि म्हणाले, ''तुला मारण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला;
पण आम्हाला ते काही शक्य झालं नाही. त्यामुळे तू निरपराध असशील आणि तू गुन्हा केलेलाच नसशील.''
''असेल असेल. असंही असू शकेल !'' गावातले सगळे लोकं पण ओरडले.
मग या चिनी भावाला सोडून दिलं आणि तो त्याच्या घरी परत आला.


Then they opened the door and pulled him out.
And he shook himself and said, "My! That was a good sleep!"
Everybody stared open-mouthed and round eyed.
But the judge stepped forward and said,
"We have tried to get rid of you in every possible way
and somehow it cannot be done.
It must be that you are innocent."
"Yes, yes," shouted all the people.
So they let him go and he went home.






त्यानंतर ते पाच भाऊ आणि
त्यांची आई
सर्वजण मजेत राहू लागले.

And the Five Chinese Brothers
and their mother
all lived together
happily for many years.





पाच चिनी भाऊ होते. ते दिसायला अगदी एकसारखे होते.
एका भावाला विनाकारण फाशीची शिक्षा होते.
त्यावेळी दुसरा भाऊ त्याच्या जागी जातो. कोणालाही त्याची शंका येत नाही.
प्रत्येक भावाचा एक गुण असतो. त्यामुळे प्रत्येक वेळी एकेक भाऊ वाचतो
आणि शेवटी सगळेजण आणि त्यांची आई
मजेत रहातात. अशी ही एक छान गोष्ट मुलांना खूप आवडेल.

There were Five Chinese Brothers.
They looked exactly the same.
One brother was wrongly sentenced to death.
On every execution, one brother substituted for the other.
No one suspected them. Every brother had a special quality.
In the end the brothers are saved.
They spend the rest of their life happily with their mother.
An evergreen story.


**गरवारे बालभवन**
**कजा कजा मरू प्रकाशन**

किंमत १५ रु.

**Price: 15/- Rupees**